# मी आणि तुम्ही २




## चला, शिकू या...

- स्वत:ची मातृभाषा सांगणे आणि इतरांची विचारणे
- स्वत:चे राष्ट्रीयत्व सांगणे आणि इतरांचे विचारणे
- स्वत:ची खुशाली सांगणे आणि इतरांची विचारणे
- घरी काय काय करता, हे सांगणे आणि विचारणे
- महिने
- मराठी वाक्ये वाचणे
- प्रश्नशब्द : कोणती, कोण, कसा, कशी, कसे

## आपली / तुमची / तुझी मातृभाषा कोणती?

माझी मातृभाषा हिंदी



माझी मातृभाषा इंग्लिश



माझी मातृभाषा नेपाळी




माझी मातृभाषा उर्दू



माझी मातृभाषा जर्मन



माझी मातृभाषा मराठी



माझी मातृभाषा रशियन



माझी मातृभाषा फ्रेंच



| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| मराठी | माझी मातृभाषा मराठी आहे. |
| [məraʈʰi] | madʒʰi: mat̪r̩bʰaʂa məraʈʰi: ahe. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| स्पॅनिश [spæniʃ] | माझी मातृभाषा स्पॅनिश आहे. |
| इंग्लिश [iŋgliʃ] | माझी मातृभाषा इंग्लिश आहे. |
| जपानी [ʤəpani:] | माझी मातृभाषा जपानी आहे. |
| नेपाळी [nepaɭi:] | माझी मातृभाषा नेपाळी आहे. |
| फ्रेंच [frenʧ] | माझी मातृभाषा फ्रेंच आहे. |
| जर्मन [ʤərmən] | माझी मातृभाषा जर्मन आहे. |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| आपली मातृभाषा कोणती? (मराठी) | माझी मातृभाषा मराठी आहे.<br>आपली मातृभाषा कोणती? |
| apli: mat̪r̩bʰaʂa koɳt̪i:? [məraʈʰi:] | madʒʰi: mat̪r̩bʰaʂa məraʈʰi: ahe.<br>apli: mat̪r̩bʰaʂa koɳt̪i:? |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| स्पॅनिश [spæniʃ] | माझी मातृभाषा स्पॅनिश आहे.<br>आपली मातृभाषा कोणती? |
| इंग्लिश [iŋgliʃ] | माझी मातृभाषा इंग्लिश आहे.<br>आपली मातृभाषा कोणती? |
| जपानी [ʤəpani:] | माझी मातृभाषा जपानी आहे.<br>आपली मातृभाषा कोणती? |
| नेपाळी [nepaɭi:] | माझी मातृभाषा नेपाळी आहे.<br>आपली मातृभाषा कोणती? |
| फ्रेंच [frenʧ] | माझी मातृभाषा फ्रेंच आहे.<br>आपली मातृभाषा कोणती? |
| जर्मन [ʤərmən] | माझी मातृभाषा जर्मन आहे.<br>आपली मातृभाषा कोणती? |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| तुमची मातृभाषा कोणती? **मराठी** | माझी मातृभाषा मराठी आहे.<br>तुमची मातृभाषा कोणती? |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| स्पॅनिश | माझी मातृभाषा स्पॅनिश आहे.<br>तुमची मातृभाषा कोणती? |
| इंग्लिश | माझी मातृभाषा इंग्लिश आहे.<br>तुमची मातृभाषा कोणती? |
| जपानी | माझी मातृभाषा जपानी आहे.<br>तुमची मातृभाषा कोणती? |
| नेपाळी | माझी मातृभाषा नेपाळी आहे.<br>तुमची मातृभाषा कोणती? |
| फ्रेंच | माझी मातृभाषा फ्रेंच आहे.<br>तुमची मातृभाषा कोणती? |
| जर्मन | माझी मातृभाषा जर्मन आहे.<br>तुमची मातृभाषा कोणती? |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>तुझी मातृभाषा कोणती ? (मराठी)<br>t̪udʒʰi: mat̪rbʰaʂa kont̪i:? [məraʈʰi:] | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>माझी मातृभाषा मराठी आहे.<br>तुझी मातृभाषा कोणती ?<br>madʒʰi: mat̪rbʰaʂa məraʈʰi: ahe.<br>t̪udʒʰi: mat̪rbʰaʂa kont̪i:? |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| स्पॅनिश [spæniʃ] | माझी मातृभाषा स्पॅनिश आहे.<br>तुझी मातृभाषा कोणती ? |
| इंग्लिश [iŋgliʃ] | माझी मातृभाषा इंग्लिश आहे.<br>तुझी मातृभाषा कोणती ? |
| जपानी [dʒəpani:] | माझी मातृभाषा जपानी आहे.<br>तुझी मातृभाषा कोणती ? |
| नेपाळी [nepaɭi:] | माझी मातृभाषा नेपाळी आहे.<br>तुझी मातृभाषा कोणती ? |
| फ्रेंच [frentʃ] | माझी मातृभाषा फ्रेंच आहे.<br>तुझी मातृभाषा कोणती ? |
| जर्मन [dʒərmən] | माझी मातृभाषा जर्मन आहे.<br>तुझी मातृभाषा कोणती ? |
| ... | ... |



### 9 ऐकू या आणि शब्दांतील रिकाम्या जागा भरू या.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अननस | क---ळ | ---गर | छा--- | आर--- |
| ---णस | क---ट | ---टा | आ--- | ---न |
| शा--- | ---मणी | ---पयोग | इ---रत | ---र |
| द--- | ---री | ऊ--- | दि---स | बा---ली |
| कु---र | ऊ--- | लु---बुड | आं--- | ---रवा |
| ए---दम | ला--- | ---ळा | | |

# मी आणि तुम्ही २

## आपण कोण?




संवाद

सराव

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| माझा देश जपान. मी कोण ? | मी जपानी आहे. |
| maḏʒʰa ḏeʃ ʤəpan. mi: koɳ? | mi: ʤəpani: ahe. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| माझा देश नेपाळ. मी कोण ? | मी नेपाळी आहे. mi: nepaḷi: ahe. |
| माझा देश भूतान. मी कोण ? | मी भूतानी आहे. mi: bʰu:ṯani: ahe. |
| माझा देश पाकिस्तान. मी कोण ? | मी पाकिस्तानी आहे. mi: pakisṯani: ahe. |
| माझा देश बांगलादेश. मी कोण ? | मी बांगलादेशी आहे. mi: baŋgəlaḏeʃi: ahe. |
| माझा देश म्यानमार. मी कोण ? | मी म्यानमारी आहे. mi: mjanmari: ahe. |
| माझा देश रशिया. मी कोण ? | मी रशियन आहे. mi: rəʃijən ahe. |
| माझा देश भारत. मी कोण ? | मी भारतीय आहे. mi: bʰarəṯi:jə ahe. |
| माझा देश अफगाणिस्तान. मी कोण ? | मी अफगाणी आहे. mi: əfgaɳi: ahe. |
| माझा देश अमेरिका. मी कोण ? | मी अमेरिकी आहे. mi: əmeriki: ahe. |
| माझा देश ब्रिटन. मी कोण ? | मी इंग्रज आहे. mi: iŋgrəḏʒ ahe. |
| माझा देश पोलंड. मी कोण ? | मी पोलिश आहे. mi: poliʃ ahe. |
| माझा देश फ्रान्स. मी कोण ? | मी फ्रेंच आहे. mi: frenʧ ahe. |
| माझा देश पोर्तुगाल. मी कोण ? | मी पोर्तुगीज आहे. mi: porṯugi:ḏʒ ahe. |
| माझा देश जर्मनी. मी कोण ? | मी जर्मन आहे. mi: ʤərmən ahe. |
| ... | ... |

उच्चार

## जोडाक्षरे शिकू या.



च् + च = कच्चा




ख् + ख = लख्ख



ट् + ट = अट्टल



क् + क = पक्का



ज् + ज = सज्ज

ग् + ग = रग्गड

ठ् + ठ = मठ्ठ

## २ याचप्रमाणे आता आपण लिहू या.

| |
|---|
| क् + क = अक्कल |
| -------- + -------- = अत्तर |
| -------- + --------- = चप्पल |
| -------- + -------- = अव्वल |
| -------- + -------- = अय्या |
| -------- + -------- = सल्ला |

| | |
|---|---|
| त् + य = त्य | सत्य |
| ड् + य = ड्य | घड्याळ |
| द् + य = द्य | विद्या |
| ळ् + य = ळ्य | पोळ्या |
| स् + ट = स्ट | पोस्ट |
| म् + ह = म्ह | म्हण |
| स् + त = स्त | रस्ता |











## ३ याचप्रमाणे आता आपण लिहू या.

| |
|---|
| क् + य = वाक्य |
| --- + --- = डॉक्टर |
| --- + --- = स्वर |
| --- + --- = पुस्तक |
| --- + --- = शब्द |

| | |
|---|---|
| क् + र = क्र | क्रम |
| म् + र = म्र | नम्र |
| ट् + र = ट्र | ट्रक |
| ड् + र = ड्र | ड्रम |
| त् + र = त्र | पत्र |
| र् + ष् = र्ष | वर्ष |
| र् + य = र्य | सूर्य |
| र् + य = ऱ्य | सुऱ्या |









## ४ याचप्रमाणे आता आपण लिहू या.

| |
|---|
| त् + र = मित्र |
| --- + --- = ग्रह |
| --- + --- = बर्फ |
| --- + --- = कैऱ्या |
| --- + --- = ट्रॅम |

## ५ अक्षरे जोडू या.

| |
|---|
| क् + क = क्क |
| ब् + ब = |
| ग् + ग = |
| द् + द = |
| ण् + ण = |
| य् + य = |
| त् + त = |
| ड् + ड = |
| प् + प = |

| |
|---|
| त् + य = त्य |
| ब् + र = |
| स् + ट = |
| द् + य = |
| म् + ह = |
| झ् + य = |
| त् + र = |
| ड् + य = |
| र् + य = 'ऱ्य'/'र्य' |

उच्चार

# २ मी आणि तुम्ही

उच्चार

## ६ वाचनाचा सराव करू या.

क् - फक्त, फ् - कोफ्ता

ख् - ख्याती, ग् - मग्न, घ् - विघ्न, च् - कच्चा, छ् - छ्या, ज् - राज्य, झ् - माझ्या, ण् - राण्या, त् - सत्तर,

थ् - तथ्य, ध् - मध्य, न् - न्याय, प् - चप्पल, ब् - शब्द, भ् - अभ्यास, य् - अय्या, व् - सव्वा, श् - अवश्य,

ष् - आयुष्य, स् - मस्ती

ङ - वाङ्मय, ट् - कट्टा/कट्‌टा, कट्यार, ठ् - मठ्ठ/मठ्‌ठ, ड् - साड्या, अड्डा/अड्‌डा, ढ् - बलाढ्य,

द् - गद्य/गद्‌य, द्वार/द्‌वार, मुद्दाम/मुद्‌दाम, उद्गार/उद्‌गार, पद्म/पद्‌म, सद्भाव/सद्‌भाव, ल् - सल्ला, उल्हास,

ह् - असह्य, ळ् - कळ्या

र् - सूर्य, सुऱ्या, ट्रक, क्रम, पत्र

## ७ ऐकू या आणि शब्दांतील रिकाम्या जागा भरू या.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| फळ | को----- | -----ती | म----- | वि----- | क----- |
| रा----- | मा----- | रा----- | स-----र | त----- | म----- |
| अव----- | च-----ल | क----- | क-----र | म----- | सा----- |
| बला----- | ग----- | उ-----स | सू----- | | |

संवाद

## चला एकमेकांची खुशाली विचारू या.

नमस्कार कदमकाका, कसे आहात तुम्ही ?

मी मजेत आहे बेटा, तू कशी आहेस ?

मी एकदम मस्त.



आपण / तुम्ही – कसे आहात ? / कशा आहात ?

मी बरा/बरी आहे.
मी मस्त आहे.
मी ठणठणीत आहे.
मी मजेत आहे.
मी ठीक आहे.
मी उत्तम आहे.

तू – कसा आहेस ? / कशी आहेस ?

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| आपण कसे आहात ? | मी बरा आहे. |
| आपण कशा आहात ? | मी बरी आहे. |
| apən kəse ahat̪? | mi: bəra ahe. |
| apən kəʃa ahat̪? | mi: bəri: ahe. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| आपण कसे / कशा आहात ? मस्त [məst̪ə] | मी मस्त आहे. |
| | आपण कसे / कशा आहात ? |
| मजेत [mədʒet̪] | मी मजेत आहे. |
| | आपण कसे / कशा आहात ? |
| उत्तम [ut̪t̪əm] | मी उत्तम आहे. |
| | आपण कसे / कशा आहात ? |
| ठीक [tʰi:k] | मी ठीक आहे. |
| | आपण कसे / कशा आहात ? |
| ठणठणीत [tʰəntʰəni:t̪] | मी ठणठणीत आहे. |
| | आपण कसे / कशा आहात ? |
| बरा / बरी [bəra / bəri:] | मी बरा / बरी आहे. |
| | आपण कसे / कशा आहात ? |
| ... | ... |

सराव

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| तुम्ही कसे आहात ? | मी बरा आहे. |
| तुम्ही कशा आहात ? | मी बरी आहे. |
| t̪umhi: kəse ahat̪? | mi: bəra ahe. |
| t̪umhi: kəʃa ahat̪? | mi: bəri: ahe. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| तुम्ही कसे / कशा आहात ? मस्त [məst̪ə] | मी मस्त आहे. |
| | तुम्ही कसे / कशा आहात ? |
| मजेत [mədʒet̪] | मी मजेत आहे. |
| | तुम्ही कसे / कशा आहात ? |
| उत्तम [ut̪t̪əm] | मी उत्तम आहे. |
| | तुम्ही कसे / कशा आहात ? |
| ठीक [tʰi:k] | मी ठीक आहे. |
| | तुम्ही कसे / कशा आहात ? |
| ठणठणीत [tʰəntʰəni:t̪] | मी ठणठणीत आहे. |
| | तुम्ही कसे / कशा आहात ? |
| बरा / बरी [bəra / bəri:] | मी बरा / बरी आहे. |
| | तुम्ही कसे / कशा आहात ? |
| ... | ... |

सराव

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| तू कसा आहेस? | मी बरा आहे. |
| तू कशी आहेस? | मी बरी आहे. |
| t̪u: kəsa ahes? | mi: bəra ahe. |
| t̪u: kəʃi: ahes? | mi: bəri: ahe. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| तू कसा / कशी आहेस? मस्त [məst̪ə] | मी मस्त आहे. |
| | तू कसा / कशी आहेस? |
| मजेत [məʤet̪] | मी मजेत आहे. |
| | तू कसा / कशी आहेस? |
| उत्तम [ut̪t̪əm] | मी उत्तम आहे. |
| | तू कसा / कशी आहेस? |
| ठीक [tʰi:k] | मी ठीक आहे. |
| | तू कसा / कशी आहेस? |
| ठणठणीत [tʰəntʰəɳi:t̪] | मी ठणठणीत आहे. |
| | तू कसा / कशी आहेस? |
| बरा / बरी [bəra / bəri:] | मी बरा / बरी आहे. |
| | तू कसा / कशी आहेस? |
| ... | ... |

संवाद

## तुम्ही काय करता?

**तुम्ही दिवसभरात घरी काय काय करता?**

मी घरी पेपर वाचतो.



मी घरी आराम करते.



मी घरी अभ्यास करते.



मी घरी साफसफाई करते.



मी घरी खेळ खेळतो.



मी घरी स्वयंपाक करतो.



मी पुस्तक वाचते.



मी बुद्धिबळ खेळतो.



मी घरी टी.व्ही. बघतो.



## मोठ्याने वाचू या. तुम्हाला उच्चारात फरक करता येतो का?

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जंगल | जहाज | जेवण | जोडा | चहा | नाच | चंदन | चमचा |
| जग | जड | जीव | जमीन | वाचन | चोर | विचार | चांगला |
| जत्रा | जाळ | राजा | आवाज | चित्र | चांदणे | वचन | चकली |
| जंमत | जाडा | मजा | जोर | चेंगट | काच | चिमणी | चकणा |

बाजारात जा. ताजी भाजी आणा.

जमीन जपा, जंगल जपा, जग जपा, जीवन जपा.

चिंचेवरती चंदू चढला चढता चढता खाली पडला

चटईला टाचणी टोचली

काकांच्या कामाचे कागद काकीने कात्रीने कराकरा कापून कोपऱ्यात कोंबले.



वाचा वाचा
चार चार
चमचा चमचा




जरा जरा
जग जग
जप जप

फळ
फूल
फणस

फुटबॉल
कॉफी
फोटो

उच्चार

## हा कोणता महिना आहे?

| |
|---|
| जानेवारी |
| फेब्रुवारी |
| मार्च |
| एप्रिल |
| मे |
| जून |
| जुलै |
| ऑगस्ट |
| सप्टेंबर |
| ऑक्टोबर |
| नोव्हेंबर |
| डिसेंबर |




शब्द संपदा

## पुढील वाक्ये वाचू या.

नमस्कार. माझं नाव नेहा जोशी.
आपलं नाव काय ?
मी शिक्षिका आहे.
आपण काय करता ?
... डॉक्टर, इंजिनियर, विद्यार्थी, शिक्षक ...
अच्छा / टाटा / बरं / उद्या भेटू.

तुमचं नाव काय ?
माझं नाव ... आहे. / मी ...
तुम्ही काय करता ?
मी शिक्षिका आहे.
... डॉक्टर, इंजिनियर, विद्यार्थी, शिक्षक ...
तुम्ही इथे काय करता ?
मी इथे मराठी शिकतेय / शिकतोय.

तुझं नाव काय ?
माझं नाव ... आहे. / मी ...
तू काय करतोस / करतेस ?
मी शिक्षिका आहे.
... डॉक्टर, इंजिनियर, विद्यार्थी,
शिक्षक ...
तू इथे काय करतोस / करतेस ?
मी इथे मराठी शिकतोय / शिकतेय.

आपला / तुमचा / तुझा देश कोणता ?
माझा देश भारत (आहे).
माझा देश चीन (आहे).
माझा देश पाकिस्तान (आहे).
माझा देश स्पेन (आहे).
माझा देश रशिया (आहे).
माझा देश भूतान (आहे). ...

आपल्याला / तुम्हाला / तुला कोणता
रंग आवडतो ?
मला काळा रंग आवडतो.
मला लाल रंग आवडतो.
मला पिवळा रंग आवडतो.
मला पांढरा रंग आवडतो.

आपण / तुम्ही कुठे राहता ?
मी मुंबईमध्ये / मुंबईत राहतो / राहते.
मी पुण्यामध्ये / पुण्यात राहतो / राहते.
तू कुठे राहतोस / राहतेस ?
मी अंधेरीमध्ये राहतो / राहते.

बोलताना :
राहायला कुठे असता आपण / तुम्ही ?
राहायला कुठे आहेस तू ?

आपली / तुमची / तुझी मातृभाषा कोणती ?
माझी मातृभाषा हिंदी.
माझी मातृभाषा इंग्रजी.
माझी मातृभाषा उर्दू.
माझी मातृभाषा जर्मन.
माझी मातृभाषा रशियन.
माझी मातृभाषा फ्रेंच.
माझी मातृभाषा नेपाळी.

आपण कोण ?/ आपण कोणत्या देशाचे नागरिक आहात ?

मी भारतीय आहे.
मी बांगलादेशी आहे.
मी पाकिस्तानी आहे.
मी नेपाळीआहे.
मी भूतानी आहे.
मी जपानी आहे.
मी म्यानमारी आहे.
मी रशियन आहे.
मी अमेरिकन / अमेरिकी आहे.
मी ब्रिटिश / इंग्रज आहे.
मी अफगाणिस्तानी / अफगाणी आहे.
मी पोलिश आहे.
मी पोर्तुगीज आहे.
मी फ्रेंच आहे.
मी जर्मन आहे.

तुम्ही कसे / कशा आहात ?
तू कसा आहेस ?
तू कशी आहेस ?

मी बरा / बरी आहे.
मी मस्त आहे.
मी ठणठणीत आहे.
मी मजेत आहे.
मी ठीक आहे.

तुम्ही घरी काय करता ?

मी घरी पेपर वाचतो / वाचते.
मी घरी जेवण बनवतो / बनवते.
मी घरी अभ्यास करतो / करते.
मी घरी झोपतो / झोपते.
मी घरी खेळ खेळतो / खेळते.‘

## आता शिव्यासुद्धा...



## ८ जोड्या जुळवा.


| | |
|---|---|
| विद्यापीठ/युनिवर्सिटी | अ.  |
| बँक | ब.  |
| मार्केट | क.  |
| कॉलेज | ड.  |
| शाळा/स्कूल | इ.  |
| मॉल | ई.  |







## वाचू या ... चिंटू.



## ९ ऐकू या आणि वाचू या.

पंढरपूरच्या वेशीवरती
आहे एक छोटी शाळा,
सगळी मुलं लख्ख गोरी,
एक मुलगा कुट्ट काळा!
खूप करतो दंगामस्ती,
खोड्या करण्यात आहे अट्टल,

मास्तर म्हणतात,
''करणार काय?
न जाणो,
असेल विठ्ठल!''

■ विंदा करंदीकर.



## करा आणि शिका.

१. तुम्ही घरी काय काय करता? हावभाव करून तुमच्या सहकाऱ्यांना सांगा आणि त्यांना ओळखायला लावा. पण हे करताना तुम्ही बोलू नका.

## दृष्टिक्षेप.

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो पेपर (ते, -) (ते वृत्तपत्र) | ती मातृभाषा (त्या -) | ते घर (ती घरे) |
| तो स्वयंपाक | ती खुशाली | ते राष्ट्रीयत्व |
| तो अभ्यास | ती साफसफाई | ते उद्यान (ती उद्याने) |
| तो खेळ (ते -) | ती कॉफी (त्या -) | ते पार्क |
| तो महिना (ते महिने) | ती बँक (त्या बँका) | |
| तो टी.व्ही. (ते -) | | |
| तो उच्चार (ते -) | | |
| तो सहकारी (ते -) | | |

| सर्वनाम | क्रियापद | शिष्टाचार शब्द | प्रश्नशब्द |
|---|---|---|---|
| आपली | लिहिणे | बरा / बरी | कोणती |
| तुमची | जोडणे | मस्त | कोण |
| तुझी | झोपणे | ठणठणीत | कसा |
| माझी | खेळणे | मजेत | कशी |
| | | ठीक | कसे |
| | | उत्तम | |

## आता मला हे येतं.

**स्वतःची मातृभाषा सांगणे आणि इतरांची विचारणे.**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**स्वतःचे राष्ट्रीयत्व सांगणे आणि इतरांचे विचारणे.**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**स्वतःची खुशाली सांगणे आणि इतरांची विचारणे.**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी



**घरी काय काय करता, हे विचारणे आणि सांगणे.**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**महिने**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**मराठी वाक्ये वाचणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**प्रश्नशब्द : कोणती, कोण, कसा, कशी, कसे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी